महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६
Email:ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in

## -: प्रसिध्दीपत्रक :-

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील रचना सहायक (गट-ब / अराजपत्रित) संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी टी.सी.एस. (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) कंपनीमार्फत परीक्षा घेण्यास शासनाच्या नगर विकास विभागाकडील पत्र दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. रचना सहायक पदासाठी परीक्षा देण्यासाठी एकूण ४४,१६६ उमेदवारांनी नावनोंदणी केली. त्यानुसार टि.सी.एस. कंपनीतर्फे दि.३१.१२.२०२४, दि.०१.०१.२०२५ व दि.०२.०१.२०२५ रोजी राज्यातील **०७ ठिकाणी एकूण ११ विविध** परीक्षा केंद्रांवर **०६ सत्रांमध्ये** ऑनलाईन स्वरुपात भरती परीक्षा घेण्यात आली असून, सदरहु पदाची परीक्षा सुरळीतपणे पार पडली आहे.

०२. उपरोक्त नमूदनुसार ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त गुणांच्या अनुषंगाने, उमेदवारांच्या माहितीसाठी दि.२२.०२.२०२५ रोजी उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात आली असून, ती अंतिम उत्तरतालिका आहे व त्यानुषंगाने नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.२८.०२.२०२५ रोजी उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(विजयकुमार ल. वाघमोडे)
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

(अविनाश भा. पाटील)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.